MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidya Warta®

## International Multilingual Research Journal

Issue-23, Vol-05 January to March-2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

14) Comparative Study on a New Species of Cladosporium .......
Shrinarayan Tripathi, Arpana Mishra || 68

15) Self-concept of Prospective Teachers in the Context of .......
Dr. Maheswar Panda, Sri Baburam Pani, Sri Sarangadhar Kar || 72

16) SOLO CLASSICAL DANCE WITH RESPECT TO SANSKRIT .......
Divya J Patel || 81

17) DIFFERENT TRADITIONS OF YOGA
Patel Hanuman || 86

18) People Participation and Rural Development: A Case .......
Mr. Kuldip Narayan Patil, Dr. V. B. Kakade || 90

19) CONSUMER BUYING BEHAVIOUR IN CAR PURCHASING......
D. Sarveswara Reddy, Prof. B. Krishna Reddy || 96

20) FRAGMENTS OF INDIAN ARCHITECTURE
Dr. Laxmi Shrivastava || 102

21) Theme of Death in Emily Dickinson's Poetry
Dr. Mariam Thomas || 105

22) GOVERNMENT POLICIES AND PROGRAMS TOWARDS AGRICULTURE
S. Velanganni || 109

23) REFLECTION OF HUMANITY AND ITS DEVELOPMENT IN DORIS .......
Dr. D. N. Ganjewar, Mr. Tupe Pandit Mahipati || 120

24) खान्देशातील आदिवासींचा स्वातंत्र्य लढा - एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप
प्रा. राजेश सखाराम पाडवी || 123

25) जागतिकीकरणाच्या प्रभावाचे विश्लेषणात्मक अध्ययन
प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव || 125

26) भारतातील उदयोन्मुख प्रक्षेपण सेवा क्षेत्र
Dr. Ronil Kulbhushan Ahale || 129

27) संतमेळ्याची अभंगवाणी
प्रा. रमेश बलभीम जाधवर || 131


https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

UGC Appr
Sr.No.62

Vidyawarta® | Jan. To March 2018
Issue-23, Vol-05 | 0125

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *

25

# जागतिककीकरणाच्या प्रभावाचे विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

सद्यकालिन जागतिक व्यवस्थेसह अनेक घटक, शासन, प्रशासन, अर्थकारण या सर्वांना प्रभावित करण्याचे काम अनेक संकल्पना, विचारधारांनी केले आहे. त्यातील एक महत्वाची विचारधारा व व्यवस्था म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणाचा प्रभाव नाही असा एकही देश, संस्था, व्यक्ति आपणास २१ व्या शतकात सापडणार नाही. जागतिकीकरणाच्या या प्रभावास २० व्या शतकापासून प्रारंभ झाला. जागतिकीकरण ही एक जगातील अनेक शक्तिशाली व्यवस्थेपैकी अतिशक्तीशाली व्यवस्था आहे. कारण या व्यवस्थेने आर्थिक, उद्योग विकासाला अधिक प्रभावित केले. राष्ट्र-राज्याच्या सत्तेसमोर अनेक आव्हाने निर्माण केली. विविध देशातील स्थानिक व राष्ट्रीय संस्कृती आणि परंपरांना नष्ट करण्याचा घाट रचला. देशांच्या आर्थिक व सामाजिक स्थैर्यास धोका पोहोचवला. जागतिकीकरणाने पाश्चिमात्य जगतातील संस्कृती, विचार व प्रतिमांना संबंध जगभर पसरवले. जागतिकीकरणाने सामाजिक सभ्यता, एकता, बांधीलकी यांच्या समोर अनेक आव्हाने निर्माण केली. आज जागतिक संस्कृतीच्या नावावर संपूर्ण जगात पाश्चिमात्य संस्कृती थोपवली जात आहे. जागतिकीकरणाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शहराकडे चला या विचारास अधिक दृढ बनवले. तर महात्मा गांधीच्या स्वप्नातील आदर्श खेड्याचे स्वरुप पूर्णपणे बदलून टाकले. त्यामुळे शहरीकरणाचा वेग वाढला. तर संपूर्ण जगाला आर्थिकता व ग्राहकांचे स्वरुप प्राप्त झाले. जागतिकीकरणाची व्यवस्था राष्ट्र-राज्यातील नागरिकांकडे ग्राहकाच्या रुपाने पाहते. या ग्राहकाची इच्छा, आकांक्षा व त्याच्या स्वप्नांना पूर्ण करण्याच्या दिशेने उद्योग व व्यापार जगताची होणारी वाटचाल होत आहे.

जागतिकीकरणाने बरेच प्रश्न सोडवले, तर बरेच प्रश्न निर्माण केले. जागतिकीकरणाच्या प्रारंभाचा कालावधी साधारण २६ वर्षांचा समजला जातो. या २६ वर्षांने लोकातील आर्थिक अंतर वाढवले. जागतिकीकरणाने जगातील एका वर्गात बरीच सुधारणा केली. तर तसेच विषमताही वाढवली. आर्थिक विषमतांनी निर्माण केलेल्या पोकळीस भरुन काढण्यासाठी बऱ्याच देशात प्रखर राष्ट्रवादी पक्ष व नेत्यांचा उदय होत आहे.

जागतिकीकरण एक बहुआयामी प्रक्रिया आहे. तसेच ती बरीच गुंतागुंतीची व व्यापक प्रक्रिया आहे. जिचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, व्यापारी व तंत्रज्ञानात्मक आयाम आहेत. विकसित आणि विकसनशील देशातील जीवन स्तर सुधारण्यात या प्रक्रियेने मुख्य योगदान दिले. जागतिकीकरणाचा प्रभाव हा एक फार व्यापक विषय आहे. ज्याने समाजातील काही घटकांना मुख्य प्रवाहात आणले. तर मुख्य प्रवाहातील काही घटकांना बाहेर फेकुन दिले. जागतिकीकरणाच्या प्रभावाचा अभ्यास करताना मागील २७ वर्षाच्या वाटचालीकडे पहावे लागेल. कारण या २७ वर्षात जागतिकीकरणाने मनुष्य व राष्ट्राच्या जीवनाला अधिक प्रभावीत केले. कांहीसाठी जागतिकीकरण संधी, प्रगतीचे प्रवेशद्वारे व आर्थिक प्रगतीचे साधन बनला तर काहीसाठी बेकारी आणि दारिद्र्याचे कारण बनला. जगातल्या प्रत्येक विकसनशील, विकसित किंवा तीव्र गतीने विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेत लोकांचा विकसित किंवा तीव्र गतीने विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेत लोकांचा आर्थिक स्तर मध्यम वर्ग ते श्रीमंत असा प्रवाहीत झाला. तर औद्योगिक देशात गरीब व निराश लोकांचा समावेश वंचितात झाला.

जागतिकीकरणाच्या प्रभावाचा अभ्यास अनेक अभ्यासक विविध देशात करत आहेत. याठिकाणी मागील २७ वर्षात भारतीय राज्य, समाज, अर्थव्यवस्था व संस्कृतीला जागतिकीकरणाने ज्या पध्दतीने प्रभावित केले. त्याकडे दृष्टीक्षेप टाकुनच विश्लेषण करण्यात आले. भारतासारख्या विकसनशील देशाला जर जागतिकीकरणाने सर्वांगिण दृष्टीकोनातून प्रभावित केले असेल तर इतरही विकसनशील देशात काही प्रमाणात जागतिकीकरणाचा परिणाम याच पध्दतीने झाला असावा असे गृहित धरण्यास कांही हरकत नाही. भारतासारख्या देशात प्रारंभीच्या टप्प्यात जागतिकीकरणा विरोधीचे वारे तीव्र गतीने वाहत होते. सर्वच क्षेत्रातून त्यास विरोध केला जात आजही होतो. परंतू जागतिकीकरणाच्या प्रभावाने अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलाकडे पाहुन त्याची धार काही प्रमाणात कमी जाणवते. परंतू या अर्थव्यवस्थेचा वापर गरिबांच्या विकास व हितपूर्तीसाठी किती प्रमाणात होतो. याकडेही लक्ष द्यावे लागेल. प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश हा नसून जागतिकीकरणाच्या प्रभावाचे विश्लेषण करण्याचा आहे.

जागतिकीकरणाच्या व्यवस्थेने आशिया, आफ्रिका, लॅटीन, अमिरेकेसह युरोप व अमेरिकेतील अनेक देश व त्या देशात राहणाऱ्या शहरी, ग्रामीण, आदिवासी समाज व त्यांच्या संस्कृतीला प्रभावित



Scanned by CamScanner

केले. याद्वारे आपणास त्या प्रभावाला समजून घ्यायचे आहे. आमचे खाण, पाण, पोशाख आणि विचार करण्यावरही जागतिकीकरणाचा प्रभाव आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया जगातील अनेक संस्कृतीसाठी धोकादायक आहे. जागतिकीकरणाने सांस्कृतिक एकता व समानता निर्माण होते. म्हणजेच संपूर्ण जगावर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिकेला अंतिम व सर्वोच्च मानले जाते. अमेरिका कॅंद्रीत व्यवस्था आहे. ज्यामुळे लोकशाही, संस्कृति आणि नागरिकत्वाचा विषय पुन्हा दावला जात आहे. जागतिकीकरणाने उदयास येणारी जागतिक सामुहिक संस्कृति व जागतिकीकरणाने उदयास येणारी जागतिक सामुहिक संस्कृती व तिचे स्वरुप निश्चितच अमेरिकन असेल तिची अभिव्यक्ती माहिती तंत्रज्ञान, फिल्म, दुरदर्शन यासह विविध तंत्रज्ञानात्मक साधनांच्या साह्यानेच होईल. संपूर्ण जगाचा विचार करता इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे मनोरंजनाचे मुख्य साधन आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया प्रभुत्वशाली, वर्चस्ववादी व अभिजन समाजाच्या संस्कृतिला आदर्श मानते. त्याचे समर्थन करुन तिचे इतर समाज व लोकांसमोर समर्थन मानते. त्याचे समर्थन करुन तिचे इतर समाज व लोकांसमोर समर्थन व बढाई केली जाते. ती करताना इतरांच्या मन व अर्थाला प्रभावित व वशीभुत करुन त्याने त्याचे अनुकरण तात्काळ करावे अशी मांडणी होते. परिणामतः याच्या चक्राकारात गुरफटलेल्या लोक व देशांची स्वतःची संस्कृती, सांस्कृतीक आदर्श विचार व अर्थव्यवस्थेचा दम घुटतो व ती नष्ट होते. तिसऱ्या जगातील देशात अमेरिकन संस्कृतीचा प्रभाव अधिक पडत आहे. पाश्चात्य संस्कृतीचे खान-पान, राहणीमान, लेखन प्रमाण मानले जाते. या जागतिकीकरणात मानवता, मानवी मूल्य, संवेदनशीलता, मनुष्यता, नैतिकता, सामाजिकता या मुल्यांचा ऱ्हास होत आहे. अमेरिकन व युरोपीयन समाजात जागतिकीकरणाने विकसित होणारे भांडवली दोष एक जीवन मुल्य म्हणून भारतात रुजत आहेत. ज्यामुळे भांडवलाची लयलूट, भोगवादी वृत्ती, चंगळवादी जीवनशैली व्यक्तिवादी जीवनाचा बोलबाला इत्यादीमुळे गांधीवादी मुल्य व विचारधारा लुप्त होत आहे. जागतिकीकरणाने भारतीय समाजाचे भांडवली व यांत्रीक समाजात रुपांतर केले. भांडवलवादाच्या तंत्रज्ञानयुक्त उत्पादन व विकासाने भारत आणखीन बराच वंचित आहे. परंतु त्यातुन उत्पन्न होणारे अनेक दोष भारतीय जनमाणस व समाजात पसरल्याचे जाणवते.

भारतात जागतिकीकरणापूर्वी अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या. उदा : इंग्लंड, डच, फ्रांस, पोर्तुगीज इ. आशिया, आफ्रिका खंडातील अनेक देशावर त्याचे बराच काळ शासन होते. परंतु जागतिकीकरणाच्या माध्यमातून विकसित झालेल्या बहुराष्ट्रीय कंपन्याचे स्वरुप व व्याप्ती विशाल आहे. जागतिकीकरणाने भौगोलिक, नैसर्गिक सीमांचा नाश केला. वस्तुंच्या आयात-निर्यातीत सांस्कृतीक आदान प्रदानास अनुकुल वातावरण निर्माण झाले. या वातावरणात सांस्कृतिक सृजनशीलता लुप्त झाली. या व्यवस्थेने संपुर्ण जगात व्यापाराचे एक जाळे निर्माण केले. ज्याने जगातील कोणत्याही कोपऱ्यात वस्तु खरेदी केल्याने एकच मुल्य व गुणात्मकतेचे युग निर्माण केले. अनेक संस्कृतीच्या आदान-प्रदानातून बहुसंस्कृतीवादी व्यवस्था उदयास येत आहे. ज्यात जगातील सर्वच संस्कृतीचे लोक व्यापार व आर्थिक हितसंबंधांच्या देवाण घेवाणीसाठी एकत्रित येतील. परस्पर संघर्ष करतील, ज्यातून जगात सांस्कृतिक संदेशाचे वहन वेगवेगळ्या पध्दतीने होईल. परंतु चव, कृति, आवड, निवड याबाबत मात्र एकरुपता व समरुपता जाणवते.

वर्तमान जग नव्या सांस्कृतिक चेहऱ्याची निर्मिती करत आहे. बाजाराभिमुख व्यवस्थेने नवनवे बदल घडवले. या बदलात अनेकजन व्यवस्थेच्या बाहेर फेकले गेले. जागतिकीकरणाच्या संकल्पनेने अमेरिकन व युरोपीयन संस्कृति आणि भांडवलवादाचा अधिक विस्तार केला. याशिवाय दुसरी कोणती संस्कृती, सभ्यता, जीवनशैली, जीवनाचे तत्वज्ञान नाही. ज्यामुळे भारतासारख्या अनेक देशातील लहान-लहान, जातीसमुह, आदिवासी यांच्या परंपरागत आठवणी व सांस्कृतिक ओळखीस नष्ट केले. त्यामुळे त्या आपले अस्तित्व टिकवण्यासाठी सातत्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेशी संघर्ष करतात. जागतिकीकरण एका बाजुने राष्ट्रा-राष्ट्रात सांस्कृतिक देवाण-घेवाण करतो. तसेच कमजोर, तत्वज्ञानाचा व अनुयायाचा भक्कम आधार नसलेल्या संस्कृतीला नष्ट करुन स्वतःचे वर्चस्व निर्माण करत आहे.

जागतिकीकरण एक अशी पश्चिमी केंद्रीयतेचे नाव आहे. जे अमेरिकेस सार्वभौम मानते. उत्तर आधुनिक संस्कृती विश्वव्यापी अमेरिकी सैन्य व आर्थिक प्रभुत्वाची नवी लहर आहे. वर्तमान समाजात मानवी वर्तनाचे निर्धारक आर्थिक घटक आणि औद्योगिकता यांची संयुक्त भुमिका आधुनिक सामाजिक जीवन आणि सांस्कृतिक विमर्शापेक्षा अधिक बहुराष्ट्रीय वैश्विक भांडवलवादाशी अधिक जुळली आहे. ज्यास आपण उत्तर आधुनिकतावाद म्हणतो.

जागतिकीकरणाने जेवढे या जगातील समाज व संस्कृतीला प्रभावित केले. तेवढेच अर्थव्यवस्थेलाही प्रभावित केले. आर्थिक घटकावरील प्रभावातुन जगाच्या इतर घटकावरील प्रभाव हे जागतिकीकरणाचे सुत्र आहे. जागतिकीकरणाने बाजाराभिमुख अर्थव्यवस्था सुतोवाच केले. ज्यात बाजार मुक्त असेल. परंतु वास्तवतेत त्याचे एकाधिकाराच्या दिशेने प्रचलन झाले. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या परस्परातील सहकार्याने बाजाराचे वास्तव चित्र बदलले. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि राष्ट्रीय कंपन्या यांच्यातील घनिष्ठता वाढत



Scanned by CamScanner

आहे. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष, स्पर्धा न होता सहकार्य होत असल्याचे जाणवते. जागतिकीकरणाच्या आर्थिक प्रभावाने संपुर्ण जगाला एका नव्या संकटाकडे नेले. आर्थिक जागतिकीकरणामुळे सामाजिक मानवाचे आर्थिक व बाजाराभिमुख मानवात रुपांतर झाले. परिणामतः मनुष्य आपल्या अनेक अनेक कौटुंबिक व सामाजिक जबाबदारीतून मुक्त होवून फक्त अधिकाराची भाषा करु लागला. कर्तव्य न करता फक्त संधीचा फायदा स्वतःच्या हितासाठी घेवून बोलघेवडेपणाचा आव आणुन स्वतःची कर्तृत्वाची बाजू व भुमिका झाकुन घेत आहे. शासन व प्रशासन व्यवस्था आपल्या अनेक जबाबदाऱ्यातुन मुक्त होत आहे. सामाजिक न्यायाप्रति चिंताजनक वातावरण निर्माण झाले. आर्थिक जागतिकीकरणाने समाजातील एका वर्गास फायदा होईल. परंतु रोजगार, उदरनिर्वाह, स्वहित याबाबत शासनावर अवलंबुन राहणाऱ्या लोकांचे वाईट दिवस सुरु झाले. लोकांचे उत्पन्न व प्रगती यात बरेच अंतर वाढले आहे.

जागतिकीकरणाने देशा अंतर्गतच वसाहतवादाची स्थिती निर्माण केली. भारताचाच विचार करता प्रचंड विषमता भारतात आहे. जागतिकीकरणाने भारताला आर्थिकदृष्ट्या दोन भागात विभाजीत केले. एक ग्रामीण भारत व शहरी भारत संख्येने अधिक असलेल्या ग्रामीण भारतात शहरी भारताप्रती नोकरवर्ग व बुध्दिवाद्याप्रतीचा आक्रोश वाढवला. या आक्रोशाने भारतीय समाजात दुफळी निर्माण केली. वर्तमान भारताचे विश्लेषण करताना अभ्यासक एका भारतात लोकप्रतिनिधी, अदाणी, टाटा, बिर्ला, अंबानी इत्यादीसारख्याच्या भारत म्हणतात. तर दुसऱ्यास गरीब, पीडित, शोषीत, वंचित व ग्रस्तांचा भारत म्हणतात. या दोन्ही भारतात कमालीची दरी वाढवण्याचे काम जागतिकीकरणाने केले. पहिला भारत दुसऱ्या भारतातील लोकांसाठी संधी निर्माण करतो, परंतु त्यांचे शोषण करुनच पहिल्या भारताचे चित्र शायनिंग इंडियाचे आहे. दुसऱ्या भारतात उदरनिर्वाह व उपजीवीकेच्या पुर्तीत ग्रस्त आहे. त्यामुळे पहिल्या भारतातील घडामोडींविषयी तो अनभिज्ञ आहे. पहिल्या भारतास पाहुन जर आम्ही भारताच्या प्रगतीची आकडेवारी बनवत असू, त्यावरच या देशाचे महासत्ताक समजत असू तर ती आमची फार मोठी घोडचूक होईल. या घोडचूकीला प्रमाण मानून शासनाने धोरण व निर्णय घेवू नये. जागतिकीकरणाने मांडलेल्या नव्या युगाला समजुन घेण्याइतपतीची संधी दुसऱ्या भारतातील लोकांना द्यावी. त्यांना सोबत घेवूनच विकासाचा आलेख तयार करावा. अन्यथा दोन वेगवेगळ्या जीवनशैली, आहारशैली, संस्कृती, अर्थव्यवस्था आमच्या देशात निर्माण होतील. त्यात ताळमेळ साधुन प्रगती व विकास करणे शक्य होणार नाही. जागतिकीकरणाच्या वर्तमानातील प्रवृत्ती आणि प्रभावांनी विशेषतः आर्थिक शक्तींनी राष्ट्र-राज्याच्या पारंपारिक ढाच्यास व सत्तेस नष्ट केले. परिणामतः राज्य संस्थेची पीछेहाट होत आहे. ज्यामुळे राज्य-राष्ट्र यांच्या सत्ता, प्रभाव व वर्चस्वाचे एक नवे तंत्र विकसित झाले. या सत्ता व प्रभावाचे सुत्र अमेरिका, युरोप, जापान व चीनच्या हातात आहेत. २० व्या दशकाच्या अतिम शतकात राहणार नाहीत. याची खात्री जागतिकीकरणाच्या राज्यव्यवस्थेवर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करता जाणवते. जागतिकीकरणाने राज्याचे उत्तरदायित्व घटवले. शासनाची जबाबदेहिता, क्षमता व शक्ती कमी केली. संपुर्ण जगातील कल्याणकारी राज्याची संकल्पना गळुन पडत आहे. ज्यांची जागा हस्तक्षेपवादी व स्वायत्त राज्याने घेतली. राज्यांनी आपल्या बऱ्याच कामातून स्वतःची सुटका करुन घेतली. त्याचे कार्यक्षेत्र मर्यादित बनले. उदा : कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षितता करणे, आर्थिक, सामाजिक कल्याणाने अभिप्रेत कार्यात राज्याने कमतरता केली. लोककल्याणकारी राज्याची जागा बाजार, आर्थिक आणि सामाजिक प्राथमिकतेच्या प्रमुख निर्धारकांनी घेतली.

आंतरराष्ट्रीय समुयाची प्रसन्नता, विश्वास मिळवण्याच्या प्रयत्नात राष्ट्रीय शासनानी स्वतःचे सार्वभौमत्व धोक्यात आणले. कारण राष्ट्रीय शासनास बहुराष्ट्रीय कंपन्यासोबतीचे करारातून स्विकारलेल्या मापदंड आणि मागण्यापुढे झुकावे लागत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय संस्थामार्फत राष्ट्रीय शासनाची तपासणी व चौकशी होत आहे. अलिकडील काही करार व सहकार्यांच्या पध्दतीने राष्ट्र-राज्याच्या क्षेत्राधिकारास गंभीर नुकसान पोहचवले. राजकीय संबंधाच्या नियमनाशिवाय आधुनिक करार राष्ट्र-राज्यांवर राजकीय, आर्थिक पर्यावरणीय व मानवी हक्कांची जबाबदारी थोपवतात. जागतिकीकरणाने जगातील विकसनशील व मागास देशांना आर्थिकदृष्ट्या आपल्या कब्ज्यात घेतले. आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटनांनी या देशांना मजबुर करुन त्यांच्यातील हस्तक्षेप वाढवला. त्यामुळे पारंपारिक राष्ट्र-राज्याची व्यवस्था संकटात अडकली. कारण राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था निर्धारणात आणि संचालनात विकसित पश्चिमी देश आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका महत्वाची बनली. विकसनशील देशांच्या आर्थिक आणि उत्पादन क्षेत्रावर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नियंत्रण वाढले. परिणामतः विकसित देशांच्या अटींच्या अधीन राहणारे बाजार व अर्थव्यवस्थेचा उदय झाला. त्यामुळे अनेक देश विकसित देशांच्या हितसंबंधांशी मिळत्या जुळत्यास धोरणाचा स्विकार करत. जागतिकीकरणामुळे संपूर्ण जगात वस्तूंचा व्यापार व गुंतवणुकीत वाढ झाली. आयात-निर्यातीवरील प्रतिबंध हटवण्याची स्पर्धाच लागली. जागतिकीकरणाच्या विचाराने राष्ट्राच्या भौगोलिक सीमा दूर केल्या. जागतिकीकरणाने वस्तू आणि भांडवलाचा प्रवाह जगाच्या कानाकोपऱ्यात नेला. परंतु तेवढाच दूर



Scanned by CamScanner

लोकांचा प्रवास वाढला नाही. तर दुसरीकडे विकसित देश आपल्या वीजा धोरणातून आपल्या राष्ट्रीय सीमांना सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरुन इतर देशातील नागरिक विकसित देशातील नागरिकांच्या नौकऱ्या व व्यापार हिसकावणार नाही. उदा : इंग्लंडचे युरोपीय महासंघातून ब्रेक्झीट होणे, तर अमेरिकेत राष्ट्रवादी विचाराने म्हणजेच अमेरिका फर्स्ट, अमेरिकन फर्स्ट या विचारांच्या डोनाल्ड ट्रम्पचे राष्ट्राध्यक्ष होणे. याबाबी जागतिकीकरणाचे समर्थन व प्रचार व प्रसार करणारे राष्ट्रच त्याविरोधात भूमिका घेत आहे. अमेरिका आणि युरोप म्हणजे जागतिकीकरण अशी भुमिका पक्की होताना वरील उलथपुलथ जागतिकीकरणा बाबतचा अंतरविरोध स्पष्ट करते.

जागतिकीकरणाने समाज, संस्कृति, अर्थव्यवस्था, राष्ट्र-राज्यासह अनेक घटकांना प्रभावित केले. जागतिकीकरण ही एक अतिशक्तीशाली व वादग्रस्त व्यवस्था आहे. जीने संपूर्ण जगाला बदलून टाकले. जागतिकीकरणाने जगाच्या आर्थिक व्यवहाराला नियंत्रित व संचलित करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना केली. इंटरनेट, चित्रपट, उपग्रहीय चैनल, फेसबुक, व्हॉटसअप, ट्वीटर इत्यादींच्या साह्याने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती केली. या व्यवस्थेने बाजाराचे वर्चस्व मान्य केले. ज्यास नव उदारमतवाद या संकल्पनेत अभ्यासले जाते. वर्तमानातील जागतिकीकरण संकल्पना पश्चिमी वर्चस्वाची मान्यता आहे. एक अर्थव्यवस्था; एक समाजव्यवस्था, एक संस्कृती, एक भाषा, सर्वमान्य इतिहास याचे समर्थन करते. जागतिकीकरणास फॅसिस्टवादी स्वरुप प्राप्त झाले. जागतिकीकरण विश्वव्यापी आर्थिक भांडवलवादाचा एक पाया आहे. जो श्रीमंतांना अधिक श्रीमंत आणि गरीबास अधिक गरीब बनवतो. यामुळे समाजात सर्वत्र विरोधाभासी स्थिती निर्माण होते.

**संदर्भ :**


१) जात्यन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पुर्ती-खंड-३-शरद पाटील, सुगावा प्रकाशन पुणे-२००३.

२) जागतिकीकरण की नवी गुलामगिरी-नीरज-लोकायत-२००९.

३) जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय - गजानन खातू - अक्षर प्रकाशन, मुंबई-२००४.

४) जागतिकीकरण आणि शिक्षण क्षेत्र - सुधीर पानसे - लोकवाड्मय गृह - मुंबई-२००४.

५) आधुनिकता-उत्तर-आधुनिकता एवं नव समाजशास्त्रीय सिध्दांत-एस.एल.दोषी-रावत पब्लिकेशन्स, जयपूर-२००५.

६) आरक्षण आणि जागतिकीकरण-प्रा.डॉ.अशोक गायकवाड-अनूप प्रकाशन, सोलापूर-२००९.

७) योजना-जून-२०१७.

८) योजना-जूलै-२०१७.

९) उत्तर आधुनिकता-विभ्रम और यथार्थ-डॉ.रवि श्रीवास्तव-नॅशनल पब्लिशींग हाऊस, दिल्ली-२००६.

१०) समकालीन समाजशास्त्रीय सिध्दांत-वीरेन्द्र प्रकाश वर्मा-पंचशील प्रकाशन, जयपूर-२००४.


□□□

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded



Scanned by CamScanner